# सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठ

(महाराष्ट्र शासनाचे एकल तंत्रज्ञान विद्यापीठ)

वसतिगृह विभाग, शिवाजीनगर पुणे ४११ ००५.

दुरध्वनी क्र. ०२०-२५५०७६६०/७००९ ई-मेल- hostel@coeptech.ac.in


जा.क्र.सीओईपी-तंत्र विद्यापीठ/वसतिगृह/२०२५/333 दिनांक:१४/०५/२०२५.

## सुचना

वसतिगृहात वास्तव्य करणारे S.Y., T.Y. व Final Year B. Tech. च्या सर्व विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की, आपली परीक्षा (End Sem Exam) संपल्याने दिनांक २०/०५/२०२५ पर्यंत वसतिगृहातील रूमस रिक्त कराव्यात. तसेच F.Y.च्या विद्यार्थ्यांना स्वतंत्र सुचना देण्यात येईल.

वसतिगृहातील रूम रिक्त करताना विद्यार्थ्यांनी खालील कागदपत्रांची पुर्तता करणे आवश्यक आहे.

१. विद्यार्थ्यांना देण्यात आलेल्या रूमचा ताबा त्यांनी रूम सोडताना वसतिगृहाच्या रूम मधील सर्व वस्तु व्यवस्थित आहेत का ? रूम स्वच्छ आहे का? रूममध्ये कुठल्याही प्रकारचे सामान शिल्लक नाही ना? उदा. पुस्तके, पेपर रद्दी, कपडे, बकेट इ. बाबत खात्री करूनच संबंधीत ब्लॉकचे वॉर्डन यांचेकडे रूमचा ताबा देण्यात यावा.

२. संबंधीत ब्लॉकचे वॉर्डन यांचे कडून **वसतिगृह ना-हरकत प्रमाणपत्र** (Hostel No Dues Certificate) घेणे बंधनकारक आहे. (वसतिगृह प्रवेश शैक्षणिक वर्ष सन २०२५-२६ साठी वसतिगृह प्रवेश घेण्याकरीता ऑनलाईन अर्ज करण्यासाठी सदर प्रमाणपत्र बंधनकारक असेल).

३. वसतिगृहातील **मेस संबंधीत ना-हरकत प्रमाणपत्र** (Mess No Dues Certificate) संबंधीत वॉर्डन यांना दाखविण्यात यावे. (वसतिगृह प्रवेश शैक्षणिक वर्ष सन २०२५-२६ साठी वसतिगृह प्रवेश घेण्याकरीता ऑनलाईन अर्ज करण्यासाठी सदर प्रमाणपत्र बंधनकारक आहे).

वरील नियमांचे पालन न केल्यास वसतिगृह अनामत रक्कम व इतर सोई मिळणार नाहीत.

14/05/2025

**मुख्य कुलमंत्री**
**वसतिगृह विभाग**
**सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठ पुणे**

**नोट-** या शिवाय ज्या विद्यार्थ्यांना औपचारीकपणे इंटरशिप करणे आवश्यक आहे (क्रेडिट आवश्यकता/जी अनिवार्य आहे परंतु ऐच्छिक नाही) अशा विद्यार्थ्यांना वसतिगृहात राहण्यासाठी शुल्काशिवाय स्वतंत्रपणे परवानगी देण्यात येईल.

प्रत-

१. मुख्य सुचना फलक, वसतिगृह विभाग, सुचना फलकावर लावण्यासाठी.
२. सी, डी ब्लॉक, ई,एफ,जी ब्लॉक, आय-ब्लॉक, जीएचबी- ब्लॉक, वसतिगृह विभाग, सुचना फलकावर लावण्यासाठी.
३. मा. कुलसचिव, सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठ पुणे यांना माहितीसाठी सादर.
४. सर्व वॉर्डन, वसतिगृह विभाग, सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठ यांना माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी नोंद घ्यावी व अहवाल दि २५/०५/२०२५ पर्यंत सादर करावा.